**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**

**जनगणना विभाग**

**प्रसिध्दीसाठी**

**दिनांक : ०३/०३/२०१०**

**पिंपरी चिंचवड शहराचे जनगणना २०११ चे कामकाज सुरु झाले असून याकामासाठी येणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांना नागरिकांनी जनगणना संदर्भात माहिती देण्याचे सहकार्य करावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सुभाष डूंबरे यांनी केले.**

भारताची जनगणना २०११ चे कामकाज सुरु झालेले असून जनगणेचे कामकाजा पार पाडणेसाठी मा.भारत जनगणना आयोग, नवी दिल्ली यांचे कडून

| | | |
|---|---|---|
| १) | मा.आयुक्त | प्रधान जनगणना अधिकारी |
| २) | मा.अतिरिक्त आयुक्त | शहर जनगणना अधिकारी |
| ३) | मा.प्रभाग अधिकारी | चार्ज ऑफीसर |
| ४) | मा.सहाय्यक आयुक्त, जनगणना | जनगणना अधिकारी |

यांच्या नेमणूक केलेल्या आहेत. मा.अतिरिक्त आयुक्त यांनी दिनांक १६/०२/२०१० रोजी सर्व प्रभाग अधिकारी व कार्यकारी अभियंता यांची संयुक्तिक बैठक घेऊन जनगणनेचे कार्यक्रमाची आखणी केली आहे. जनगणना कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणेकामी चार मास्टर ट्रेनरची नेमणूक करणेत आली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ प्रभाग | किरण गायकवाड | ब प्रभाग | दिलीप भोईटे |
| क प्रभाग | अनिल खामकर | ड प्रभाग | शिरीष पोरेड्डी |

**जनगणनेच्या पहिल्या टप्प्याचे कामामध्ये वॉर्डनिहाय लोकसंख्या काढणे, प्रगणक गट पाडणे व गटांचे वॉर्डनिहाय व प्रभाग निहाय कल्पना दर्शक नकाशे तयार करणेचे आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २००१ चे जनगणनेनुसार लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | १०५ वॉर्डस | १०,०६,६२२ |
| ब) | नवीन समाविष्ठ गाव ताथवडे | ०१ | ७९७६ |
| | **एकूण जनगणना वॉर्डस्** | **१०६** | **१०१४५९८** |

प्रभाग निहाय व वॉर्डाचे गट पाडणेचे काम हाती घेणेत आले असून त्यासाठी खालील कर्मचारी नेमलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | चार्ज ऑफीसर | ४ | प्रभाग अधिकारी |
| २. | वॉर्ड इनचार्ज | ३५ | उपअभियंता, सहा.आरोग्याधिकारी |
| ३. | पर्यवेक्षक | ३१८ | कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभि. सहाय्यक, मुख्य आरोग्य निरिक्षक, मुख्य लिपिक, लिपिक |
| ४. | मदतनीस | १०६ | शिपाई / मजूर |
| | **एकूण** | **४६३** | |

मनपा क्षेत्रामध्ये ७२+२=७४ झोपडपट्ट्या असून झोपडपट्टीची स्वतंत्र गणना करणेची आहे. यासाठी प्रत्येक प्रभागासाठी २० कर्मचारी नेमणेत आले आहेत.

खालीलप्रमाणे प्रभागनिहाय गट होत आहेत.

| अ. क्र. | प्रभागाचे नाव | वॉर्ड संख्या | लोकसंख्या (४०% वाढ) | प्रगणक गट |
|---|---|---|---|---|
| १. | अ प्रभाग कार्यालय | २७ | ३५८६९३ | ५९८ |
| २. | ब प्रभाग कार्यालय (नवीन ताथवडेगावासह) | २४ | ३२६२५९ | ५४४ |
| ३. | क प्रभाग कार्यालय | २८ | ३७१४४८ | ६१९ |
| ४. | ड प्रभाग कार्यालय | २७ | ३६४०३८ | ६०७ |
| | **एकूण** | **१०६** | **१४२०४३७** | **२३६८** |

दुसऱ्या टप्याचे कामामध्ये घरयादी बनविणे, घरांना क्रमांक देणे व प्रगणक गटांचे कल्पना दर्शक नकाशे बनविणे चे काम माहे मे व जून २०१० चे दरम्यान होणार आहे.

सही /-

**शहर जनगणना अधिकारी**
**तथा अतिरिक्त आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**